# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि—५ महाराष्ट्र अधिनियम १९९४(१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत राज्य विद्यापीठ

**( परीक्षा विभाग )**

एम.आय.डी.सी.रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली—४४२६०५

फोन नंबर ०७१३२—२२३१०४


जा.क्र.गो.वि./परीक्षा विभाग/269/२०१६ दि. ४/२/२०१६

प्रति,

मा. प्राचार्य व परीक्षा केंद्राधिकारी

उन्हाळी—२०१६ चे सर्व परीक्षा केंद्र

**विषय:— उन्हाळी—२०१६ परीक्षा आयोजनाच्या सभेला उपस्थित राहणेबाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयांन्वये कळविण्यात येते की, विद्यापीठाने घोषित केलेल्या यादीनुसार आपले महाविद्यालय हे उन्हाळी —२०१६ च्या परीक्षेकरीता परीक्षा केंद्र म्हणुन निश्चित केलेले आहे. उन्हाळी —२०१६ परीक्षेकरीता परीक्षा केंद्रावर प्रश्नपत्रिका हया **Secured Online Question Paper Delivery** या तंत्राद्वारा प्रश्नपत्रिका Online पाठविण्यात येणार असल्यामूळे परीक्षा केंद्र दिलेल्या महाविद्यालयांतील **संगणक, इंटरनेट सुविधा, फॅक्स मशिन, प्रिंटर, झेरॉक्स** ईत्यादी साहीत्य अद्यावत करणे अंत्यत आवश्यक आहे. जेणेकरुन प्रश्नपत्रिका Online पाठविण्यात व परीक्षार्थ्यांना वितरीत करण्यात कोणतीही अडचण निर्माण होणार नाही व परीक्षा सुरळीत पार पाडता येईल.

याकरीता **Secured Online Question Paper Delivery** बाबत माहिती संबधित परीक्षा केंद्रावरील प्राचार्य व परीक्षा केंद्राधिकारी यांना देणे आवश्यक आहे.

त्याकरीता प्राचार्य व परीक्षा केंद्राधिकारी यांची सभा विद्यापीठात आयोजित करण्याचे आदेश मा. कुलगुरू महोदय यांनी दिलेले आहे. तरी आपण सर्व प्राचार्य व परीक्षा केंद्राधिकारी यांनी दिनांक १७/२/२०१६ ला विद्यापीठाच्या सभागृहात सकाळी **११.००** वाजता उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

मा. कुलगुरू महोदय यांच्या आदेशान्वये

**परीक्षा नियंत्रक**

**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

टिप:—१) सभेला उपस्थित प्राचार्य, केंद्राधिकारी यांचा प्रवासखर्च महाविद्यालयाने वहन करावा.

२) सर्व परीक्षा केंद्राधिकारी व प्राचार्य यांच्या ई—मेल आय.डी व चालु भ्रमणध्वनी नंबर अधिक्षक, परीक्षा पुर्व यांच्याकडे देण्यात यावा.